# प्रेसनोट

दिनांक २०/०५/२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री. देविदास शिवाजी चवरे, वय ३४ वर्षे, पद– लिपीक, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, वान जि. अमरावती, फिरते पथक कार्यालय हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला रा. साखरखेर्डा ता सिंदखेड राजा, जि. बुलढाणा ह.मु. श्री सिताराम भड यांचे घरी भाड्याने, हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला |
| ३ | सापळा तारीख | दिनांक २०/०५/२०२४ रोजी |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १५,००/– रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १५,००/– रूपये. |
| ६ | घटनास्थळ | फिरते पथक कार्यालय हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दि. ०३/०५/२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला येथे तक्रारदार दिली की, वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, वान जि. अमरावती कॅम्प हिवरखेड जि. अकोला येथील लिपीक श्री. चवरे हे तक्रारदार यांचे सन–२०२३–२४ या वित्तीय वर्षाचे तक्रारदाराचे इनकम टॅक्स संबंधाने केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन १,०००/– रूपये आणि एरियस काढुन दिल्याचे मोबदल्यात ५,००/–रूपये असे एकुण १५,००/–रूपये लाच रकमेची मागणी करीत आहेत. अशी तक्रार दिली.

नमुद तक्रारीच्या अनुषंगाने शासकिय पंचासमक्ष दि. ०३/०५/२०२४ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय वान जि.अमरावती कॅम्प हिवरखेड जि. अकोला येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमाविण्यात आली असता, गैरअर्जदार श्री. चवरे यांनी तक्रारदाराकडे सन २०२३–२४ या वित्तीय वर्षाचे तक्रारदाराचे इनकम टॅक्स संबंधाने केलेल्या कामाचा मोबदला १,०००/–रूपये आणि एरियस काढुन दिल्याचे मोबदल्यात ५००/–रूपये असे एकुण १५,००/–रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि. २०/०५/२०२४ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय वान जि.अमरावती कॅम्प हिवरखेड जि. अकोला येथे सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता, श्री. देविदास शिवाजी चवरे, वय ३४ वर्षे, पद– लिपीक, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, वान जि. अमरावती, फिरते पथक कार्यालय हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला यांनी तक्रारदाराकडुन १५,००/–रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले असुन त्यांच्या विरूध्द पो.स्टे. हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम–१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक श्री. मारूती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री. अनिल पवार लाप्रवि अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सचिन सावंत, पोलीस निरीक्षक श्री. नरेंद्र खैरनार, पोलीस अंमलदार डिगांबर जाधव, प्रदिप गावंडे यानी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा

मोबाईल क्र. श्री सचिन सावंत पोलीस निरीक्षक–८८५५८३०८३०
श्री नरेंद्र खैरनार पोलीस निरीक्षक–९१३००१९०७७

ऑफिस फोन नं. ०७२४–२४१५३७०
टोल फ्रि क्र. १०६४

( नरेंद्र खैरनार )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला